# मी विठ्ठल पाहिला?

## वारी अनुभव - लेख क्र. 16

**- राजश्री कुलकर्णी** (साऊथ ब्रुन्सविक, न्यूजर्सी)

**जुलै 3, 2014 गुरुवार 'नातेपुते' येथील सुंदर संगीतमय संध्याकाळ: पुढे...**

जसजसे आम्ही पंढपूरच्या जवळ येत होतो, तसतशी गर्दी वाढायला लागली. आता दिंडीतील सगळे एकमेकांना चेहऱ्याने ओळखायला लागले होते. इतके दिवसांच्या सहवासामुळे बरीचशी नावंही माहितीची झाली होती. सगळे एका लग्नकार्यासाठी जमले आहेत आणि लग्न अगदी चार दिवसांवर आलंय, असं वातावरण तयार झालं होतं. हळूहळू सगळी तयारी होत होती. सगळे पंढरपूरची आतुरतेने वाट बघत होते.

पावसाची एक हलकी सर आली. पहिल्या पावसातल्या ओल्या मातीचा सुगंध पसरला. प्रवचन सुरू झालं. अण्णा म्हणाले, "जिथे देवाचा विचार असतो, जिथे वासना नाहीत, ते पवित्र!

श्रद्धा, विश्वास, प्रेम, निर्मळ मन असेल तर भगवंत अखंड वास करतो आणि अविरत प्रेम करतो.

'अज्ञानी म्हणतात, मी देह आहे,' हे चुकीचं आहे; 'ज्ञानी म्हणतात, मी ब्रम्ह आहे', हीदेखील चुकीची समजूत आहे.

'मी,' 'परब्रम्ह आहे', 'मी सत्चित - आनंद आहे!'

जो कधीही खंडीत होत नाही, असा आनंद संतमंडळींच्या सानिध्यात मिळतो; ते लोखंडालाच परीस करून सोडतात."

प्रवचनानंतर 'राजा परांजपे प्रस्तुत' 'अभंगरंग' हा अभंगाचा कार्यक्रम होता. पाऊस सुरू झाल्यावर लोक चौकाच्या चार बाजूंना बसले.

रात्री (वरण-भात) जेवताना काही वेळ अभंग ऐकले. गाण्याची तयारी आणि निवेदन खूप छान होतं. 'अभंगरंग' ऐकताना जेवणं झाली. चित्रा-आशाताई आणि मी प्रत्येक वेळी जेवताना एकत्र बसायचो. आज त्या दोघी चौकाच्या एका बाजूला जेवायला बसल्या. कलाताई मला बोलवायला आल्या, तोपर्यंत मला त्यांच्या बाजूला जागाच उरली नाही. मी चौकाच्या दुसऱ्या बाजूला जेवायला बसले. एका वाढपीने मला बसायला आसन आणून दिलं. खूप भूक लागली होती. एकीकडे 'अभंगरंग'ची भावपूर्ण गाणी सुरू होती. पावसामुळे हवेत ओलावा होता. तरल आणि संवेदनशील वातावरण तयार झालं होतं.

**'रामभाऊ तीर्थकर'** (मूळचे एक मेकॅनिकल इंजिनियर, पण आता वारीच्या सेवेसाठी स्वत:ला वाहून घेणारे) एका बाजूला येऊन बसले. मला खूप भरून आलं. मनात संमिश्र भावना दाटून आल्या. आता पंढरपूरला पोहोचायला एका हाताच्या बोटावर



मावतील, इतके कमी दिवस बाकी होते. नकळत डोळे पाझरायला लागले. कोण कुठले लोक? ना नात्याचे, ना गोत्याचे. काहीही ओळख नसताना, काहीही अपेक्षा नसताना, इतकं प्रेम करताहेत! **'श्रीराम पोतदार'** (पुण्याचे एक उद्योगपती आणि वारी-स्वयंसेवक) बाजूला येऊन म्हणाले, की भरल्या ताटासमोर बसून डोळ्यातून पाणी काढू नका. स्वत:ला कसंबसं सावरलं. यावेळी श्रीराम यांनी दुसऱ्यांदा मला सावध केलं. पहिल्यांदा, जेंव्हा वारीची नुकतीच सुरुवात झाली होती. मागून नागाऱ्याचे बैल येत होते. माझं लक्ष नव्हतं. ते जोरात ओरडून मला म्हणाले, "बाजूला व्हा, बाजूला व्हा." त्यांनी वेळेत सावधान केलं म्हणून बरं, नाहीतर पहिल्याच दिवशी माझं काही खरं नव्हतं. माऊली प्रत्येक वेळी कोणत्या ना कोणत्या रूपात येऊन सावध करीत होती, हे नक्की!

रात्री 'दातें'च्या घरी मुक्कामाला गेलो. त्यांचा एक मोठा बंगला होता. वरच्या मजल्यावर एक प्रशस्त दिवाणखाना होता. आमच्या सोबत असलेल्या काही बायकांची तिथे सोय झाली. मला आणि चित्राला मात्र त्यांनी स्वतंत्र खोली दिली. गरम पाण्याची सोय पण होती. रात्री गरम पाण्यात पाय टाकून बसले, कपडे धुतले, आंघोळ केली आणि झोपायला गेले. भरपूर जागा, मुबलक पाणी, चोवीस तास गरम पाण्याची सोय होती. पुन्हा एकदा मी नकळत अमेरिकेत नेहमी आणि सहज मिळणाऱ्या गोष्टींची मनातल्या मनात प्रशंसा करू लागले. मात्र, गाण्याचा संपूर्ण कार्यकम बघता आला नाही, ही चुटपुट लागून राहिली.

शुक्रवार जुलै 4, **2014 गोल रिंगण (नातेपुते-माळशिरस** 19.5)

पहाटे तीन वाजता जागा आली आता आमच्यासोबत बऱ्याच



वयस्कर बायका होत्या; त्या वारीसाठी दरवर्षी सातत्याने येत असत. त्यातल्या एका काकूंनी मला बजावलं, रात्री आंघोळ

झाली असली, तरी सकाळी परत आंघोळ करायची (जी मी करीत होतेच). पण माझ्या सकाळच्या आंघोळीमुळे कोणालातरी इतकं बरं वाटेल, याची मला कल्पना नव्हती. सकाळी चार वाजता आवरून झालं.

आजपासून पुढचे तीन दिवस 'दिंडीसोबत' चालायचे असं ठरवलं होतं, पण आज आशाताईंना बरं वाटत नव्हतं. रात्री ताप होता. त्यामुळे सुरुवातीचे दोन किमी दिंडी सोबत चाललो, पण पुढचे आमचे आम्ही चाललो. हळूहळू आता सगळ्यांची तग धरण्याची क्षमता कमी होऊ लागली, हे लक्षात आलं. आज चित्राचे देखील पाय विलक्षण दुखत होते. तिच्या तळपायाला एक फोड (blister) आला होता. आशाताईंचेदेखील पाय अतिशय दुखत होते. आश्चर्य म्हणजे आज चालणं बरंच झालं असलं तरी माझे पाय मात्र विशेष दुखले नाहीत. मला उत्साही आणि ताजंतवानं वाटत होतं.

दहाच्या सुमारास 'सदाशिवनगर' इथे जेवणासाठी विसावा घेतला. जेवण खूप छान होतं. कारल्याची भाजी, पोळी, चटणी, शेवयाची खीर, वरण-भात असा बेत होता. 'देशमुख दिंडी'मधलं जेवण छान होतं, हे निर्विवाद; पण इतक्या थकव्यामुळे आम्हाला ते जास्तच चवदार आणि स्वादिष्ट लागत असे.

जेवणानंतर तिथेच झाडाखाली पथारी पसरून मस्त झोप काढली. उन्हामुळे आणि खूप चालण्यामुळे आम्ही सगळे इतके थकायचो की, कुठेही जमिनीवर पाठ टेकवली की झोप लागायची. It used to be our power nap.

आजच्या दिवसाचा सर्वोत्तम भाग आणि हायलाइट होते, **'गोल रिंगण'** आणि **'नादब्रम्ह'**! दुपारच्या जेवणानंतर **'गोल रिंगण'** बघायला गेलो. आमच्या आणि इतर सगळ्याच दिंडीचे लोकही वाजवत, नाचत, गात गोल पळत होते. '**गोल रिंगण**', '**उभ्या रिंगणा**'पेक्षा खूपच वेगळं होतं.

**(क्रमशः)**